गुरुवार दि. १३ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३४३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालन्यात बॅनरबाजीचा सुळसुळाट; मनपाचा २४ तासांचा इशारा हवेतच राहणार?

### विनापरवाना फलकांवर फौजदारी कारवाईचे आयुक्त अंजली शर्मा यांचे आदेश

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिका प्रशासनाने एकीकडे विनापरवाना होर्डिंग्स, बॅनर्स, पोस्टर्स आणि जाहिरात फलकांविरोधात कठोर भूमिका घेत २४ तासांत अनधिकृत फलक हटविण्याचे निर्देश दिले आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईसोबतच फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा इशाराही महापालिका आयुक्त अंजली शर्मा यांनी दिला आहे. मात्र दुसरीकडे १४ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जालना दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात मोठमोठ्या बॅनर्स आणि शुभेच्छा फलकांची अक्षरशः गर्दी होऊ लागली आहे.

विशेष म्हणजे काही ठिकाणी विद्युत खांबांवरही फलक झळकू लागल्याचे चित्र आहे. त्यामुळे आता महापालिका प्रशासनाच्या जाहीर सूचनेची खरी परीक्षा होणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या स्वागतासाठी लावण्यात आलेल्या या फलकांपैकी किती फलकांना महापालिकेची अधिकृत परवानगी आहे? आणि जे अनधिकृत आहेत, त्यांच्यावर मनपा प्रशासन कारवाई करणार का? हा प्रश्न आता जालनेकरांकडून उपस्थित केला जात आहे.

जालना महानगरपालिका प्रशासनाने नुकतीच प्रसिद्ध केलेली जाहीर सूचना पाहता नियमांबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. महापालिकेची परवानगी न घेता किंवा निश्चित केलेल्या जागांव्यतिरिक्त जाहिरात फलक, होर्डिंग्स, बॅनर्स, पोस्टर्स, शुभेच्छा फलक अथवा अन्य जाहिरात साहित्य लावण्यास मनाई करण्यात आली आहे.

इतकेच नव्हे तर विद्युत खांब, रस्त्यांच्या कडेला, सार्वजनिक ठिकाणी आणि धोकादायक ठिकाणी लावलेले अनधिकृत फलक संबंधितांनी स्वतःहून हटवावेत, अन्यथा मनपाकडून ते जप्त करून दंड आकारण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. नियमांचे उल्लंघन झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ आणि महाराष्ट्र मालमत्ता विरूपणास प्रतिबंध अधिनियम १९९५ अंतर्गत फौजदारी कारवाई केली जाईल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

मात्र याच काळात मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याच्या स्वागतासाठी शहरात मोठ्या प्रमाणात बॅनरबाजी सुरू झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**'परवानगी'चा हिशेब जाहीर होणार का?**

शहरात झळकणाऱ्या प्रत्येक फलकाला परवानगी आहे की नाही, याची माहिती महापालिका प्रशासनाकडे असणे अपेक्षित आहे. त्यामुळे आता मनपाने १४ ऑगस्टच्या दौऱ्याच्या निमित्ताने लावण्यात आलेल्या बॅनर्सची स्वतंत्र पाहणी करून त्यातील अधिकृत आणि अनधिकृत फलकांची संख्या स्पष्ट करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

परवानगी घेतलेल्या फलकांना निश्चित कालावधी, जागा, आकार आणि इतर नियम लागू असतील तर त्याचे पालन होत आहे का, याचीही तपासणी होणे गरजेचे आहे. अन्यथा 'परवानगी आहे' या नावाखाली नियमबाह्य फलकांना मोकळीक मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

महापालिकेच्या सूचनेत विद्युत खांबांचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे विद्युत खांबांवर लावण्यात येणारे फलक हे प्रशासनाच्या कारवाईच्या कक्षेबाहेर असू शकत नाहीत.

मात्र प्रत्यक्षात मुख्यमंत्री दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील अनेक भागांमध्ये विद्युत खांब आणि सार्वजनिक ठिकाणी स्वागताचे फलक लावले जात असल्याचे चित्र दिसत आहे.

यामुळे आता प्रश्न केवळ बॅनरबाजीचा राहिलेला नाही. महापालिका प्रशासन स्वतः प्रसिद्ध केलेल्या नियमांची अंमलबजावणी सत्ताधारी पक्षाच्या किंवा मुख्यमंत्र्यांच्या स्वागतासाठी लावलेल्या फलकांवरही समान पद्धतीने करणार का? हा खरा मुद्दा ठरला आहे.

**'सत्तेचा फलक' नियमांपेक्षा मोठा ठरणार का?**

मुख्यमंत्री जालना दौऱ्यावर येत असल्याने त्यांच्या स्वागतासाठी राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध संस्थांकडून बॅनर्स लावले जाणे स्वाभाविक असले तरी सार्वजनिक जागा वापरण्यासाठी असलेले नियम सर्वांसाठी समान असणे अपेक्षित आहे. सामान्य व्यावसायिकाने विनापरवाना बॅनर लावला तर कारवाई आणि राजकीय स्वागतासाठी लावलेल्या फलकाकडे दुर्लक्ष, असा दुहेरी निकष लागू होणार नाही ना? अशी चर्चा शहरात सुरू झाली आहे.

महापालिका प्रशासनाने जर खरोखरच उच्च न्यायालयाच्या आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला असेल, तर फलक कोणाचा आहे, त्यावर कोणत्या नेत्याचा फोटो आहे किंवा तो कोणाच्या स्वागतासाठी लावला आहे, यापेक्षा तो अधिकृत परवानगी घेऊन लावला आहे की नाही, हा एकमेव निकष असायला हवा.

महापालिकेने आपल्या सूचनेत मुंबई उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. १५५/२०११ चा उल्लेख केला आहे. या प्रकरणातील न्यायालयीन आदेशांच्या (पान २ वर)

**आयुक्तांच्या 'नातेवाईकांना बंदी' परिपत्रकाला बॅनरबाजीचे आव्हान?**

## सुजित जोगस यांच्या नावावरील पदाचा उल्लेख चर्चेत




**जालना - प्रतिनिधी**

जालना महानगरपालिका प्रशासनातील कामकाजात नगरसेवकांच्या नातेवाईकांकडून होणारा कथित हस्तक्षेप रोखण्यासाठी महापालिका आयुक्त अंजली शर्मा यांनी काही दिवसांपूर्वी जारी केलेल्या परिपत्रकाची आता शहरातील एका बॅनरमुळेच कसोटी लागल्याची चर्चा सुरू झाली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी राहुल लोणीकर यांची निवड झाल्याबद्दल शहरात लावण्यात आलेल्या अभिनंदन फलकावर प्रा. सुजित जोगस यांचे नाव आणि 'सभापती विद्युत व शिक्षण मनपा जालना शहर, प्रदेश सचिव भाजपा युवा मोर्चा महाराष्ट्र' असा उल्लेख करण्यात आल्याचे समोर आले आहे.

विशेष म्हणजे, उपलब्ध माहितीनुसार सुजित जोगस हे स्वतः नगरसेवक किंवा महापालिकेचे सभापती नसून नगरसेविका तथा सभापती भाग्यश्री जोगस यांचे नातेवाईक आहेत. त्यामुळे आयुक्तांच्या परिपत्रकात नमूद केलेल्या सूचनांच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या पदनामाचा उल्लेख प्रशासनाच्या निदर्शनास आला आहे का? आला असल्यास त्याची दखल घेऊन काय कारवाई करण्यात येणार? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

मात्र, या बॅनरवरील मजकुराबाबत संबंधितांकडून किंवा महापालिका प्रशासनाकडून अधिकृत स्पष्टीकरण अद्याप समोर आलेले नसल्याने त्यातील पदनामाचा नेमका संदर्भ आणि बॅनर कोणी तयार केला, याची स्वतंत्र पडताळणी होणे आवश्यक आहे.

**आयुक्तांनी परिपत्रकात नेमके काय म्हटले?**

जालना महानगरपालिकेच्या कामकाजात निवडून आलेल्या नगरसेवक व नगरसेविकांव्यतिरिक्त त्यांच्या नातेवाईकांचा अनधिकृत हस्तक्षेप होऊ नये, यासाठी आयुक्त अंजली शर्मा यांनी कार्यालयीन परिपत्रक जारी केले आहे.

महापालिका मुख्यालय, प्रभाग कार्यालये आणि विविध विकासकामांच्या ठिकाणी काही नगरसेवकांचे पती, पत्नी, वडील, मुले, भाऊ किंवा इतर नातेवाईक नियमितपणे वावरून प्रशासकीय कामकाजात हस्तक्षेप करत असल्याचे (पान २ वर)

संत सावता माळी महाराजांची पुण्यतिथी उत्साहात साजरी

## कर्मयोग, श्रम आणि विठ्ठल भक्तीचा संदेश देणाऱ्या संतांना अभिवादन

### *प्रभाग क्रमांक ८ मध्ये नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले यांच्या वतीने कार्यक्रम*

**जालना | प्रतिनिधी**

जालना शहरातील प्रभाग क्रमांक ८ मध्ये वारकरी संप्रदायातील महान संतकवी संत सावता माळी महाराज यांची पुण्यतिथी भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. शिवसेनेचे नगरसेवक तथा प्रतोद दुर्गेश काठोठीवाले यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात संत सावता माळी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी संतांच्या विचारांचे स्मरण करत त्यांच्या कार्याला आदरांजली वाहिली.



कार्यक्रमप्रसंगी बोलताना नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले म्हणाले की, संत सावता माळी महाराजांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून केवळ विठ्ठल भक्तीचा संदेश दिला नाही, तर सामान्य माणसाला जीवन जगण्याचा मार्गही दाखविला. ''हृदय चिरुनी हृदयात ठेवला विठ्ठल'' अशा भक्तीभावनेतून त्यांनी विठ्ठलाशी असलेले आपले नाते व्यक्त केले. त्यांच्या अभंगांमध्ये आध्यात्मिकता, श्रमाची प्रतिष्ठा, साधेपणा, समता आणि समाजजागृतीचा प्रभावी संदेश आढळतो.

''कांदा मुळा भाजी, अवघी विठाबाई माझी'' या संत सावता माळींच्या प्रसिद्ध अभंगाचा दाखला देत काठोठीवाले यांनी सांगितले की, संतांनी दैनंदिन जीवनातील साध्या-साध्या गोष्टींमध्येही विठ्ठलाचे दर्शन घडविले. शेती, श्रम आणि संसार करत असतानाही ईश्वरभक्ती करता येते, हा विचार त्यांनी समाजासमोर मांडला. त्यामुळे संत सावता माळींचे जीवन हे कर्मयोग आणि भक्तीचा सुंदर संगम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**श्रमाला प्रतिष्ठा देणारे संत**

संत सावता माळी हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संतकवी म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म सोलापूर जिल्ह्यातील आरण येथे झाल्याचे मानले जाते. शेती आणि बागायतीचे काम करत असतानाच त्यांनी विठ्ठलभक्तीचा मार्ग स्वीकारला. संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांच्या समकालीन संतपरंपरेतील एक महत्त्वाचे नाव म्हणून (पान २ वर)

## 'हर घर तिरंगा' मोहिमेंतर्गत वंदे मातरम् समूह गायन व योग प्रात्यक्षिकाचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

: 'हर घर तिरंगा' मोहिमेंतर्गत देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रप्रेम तसेच नागरिकांमध्ये आरोग्य व योगाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने 'वंदे मातरम्' समूह गायन व 'योगा फॉर हेल्थ' योग प्रात्यक्षिक कार्यक्रमाचे दि. १४ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ८.०० ते ९.०० या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, जालना येथे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमामध्ये 'वंदे मातरम्' गीताचे सामूहिक गायन तसेच 'योगा फॉर हेल्थ' अंतर्गत विविध योगासने व योग प्रात्यक्षिके सादर करण्यात येणार आहेत. या माध्यमातून नागरिक, विद्यार्थी व युवकांमध्ये देशभक्तीची भावना वृद्धिंगत करण्यासोबतच नियमित योगाभ्यासाचे महत्त्व अधोरेखित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास जिल्ह्यातील विद्यार्थी, क्रीडा शिक्षक, खेळाडू, अधिकारी-कर्मचारी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

## जालना शहरात तिरंगा रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद; हजारो नागरिकांचा देशभक्तीच्या जयघोषात सहभाग









### छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून रॅलीला सुरुवात; झाशी राणी पुतळ्याजवळ समारोप; विविध शाळांच्या विद्यार्थ्यांचाही उत्स्फूर्त सहभाग

**जालना | प्रतिनिधी**

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी जालना शहर महानगरपालिका व जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या भव्य तिरंगा रॅलीला शहरवासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हातात तिरंगा ध्वज घेऊन हजारो महिला-पुरुष, विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रातील नागरिक रॅलीत सहभागी झाले होते. यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम्□ आणि जय हिंदच्या घोषणांनी शहरातील वातावरण देशभक्तीमय झाले.

तिरंगा रॅलीची सुरुवात शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून करण्यात आली. विविध मान्यवरांच्या उपस्थितीत रॅलीला सुरुवात झाल्यानंतर नागरिक, विद्यार्थी आणि सहभागींचा मोठा समूह शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत झाशी राणी पुतळा येथे पोहोचला. तेथे रॅलीचा समारोप करण्यात आला. लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि नागरिकांचा मोठा सहभाग

रॅलीमध्ये आमदार अर्जुन खोतकर, माजी आमदार कैलास गोरंट्याल, जिल्हाधिकारी अशीमा मित्तल, जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, मनपा आयुक्त अंजली शर्मा, जिल्हा परिषद मुख्याधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया, एसडीएम दौंड, उपायुक्त नंदा गायकवाड, सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर, भाजप शहर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांच्यासह प्रशासनातील अधिकारी आणि विविध विभागांचे कर्मचारी सहभागी झाले होते. उपअभियंता कोमल गावंडे, उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांच्यासह माजी नगराध्यक्ष संगीता गोरंट्याल, नगरसेवक अक्षय गोरंट्याल, जगदीश भारतीय, सध्या देठे, दुर्गेश काठोठीवाले, दीपक राठोड, दिनेश भगत, भाऊसाहेब घुगे, सिद्धिविनायक मुळे, अर्जुन गेही, संजय देठे, प्रमोद वाघमारे आदी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी वाढविला रॅलीचा उत्साह

तिरंगा रॅलीमध्ये शहरातील अनेक शाळांनी सहभाग नोंदविला. शालेय विद्यार्थी हातात तिरंगा घेऊन मोठ्या उत्साहात रॅलीत सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांच्या घोषणांनी आणि देशभक्तीपर वातावरणामुळे रॅलीला विशेष रंगत आली. शाळांमधून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने रॅलीत सहभाग घेतला. अनेक विद्यार्थ्यांनी तिरंगा ध्वज हातात घेत देशभक्तीपर घोषणा देत नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. त्यामुळे रॅलीमध्ये युवा शक्तीचा उत्साह विशेषत्वाने जाणवत होता.

प्रमुख मार्गांवर नागरिकांची गर्दी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापासून सुरू झालेली ही रॅली शहरातील प्रमुख मार्गांवरून पुढे सरकत झाशी राणी पुतळ्याजवळ पोहोचली. रॅलीच्या मार्गावर नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तिरंगा ध्वजांची उधळण, देशभक्तीच्या घोषणा आणि सहभागींच्या उत्साहामुळे शहराचे वातावरण भारावून गेले होते. रॅलीच्या माध्यमातून स्वातंत्र्यदिनाचा संदेश सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच राष्ट्रीय एकात्मता (पान २ वर)

# संपादकीय...

## वर्दीच्या जबाबदारीसोबत संशोधनाची बांधिलकी; डॉ. विक्रम साळी यांचे यश काय सांगते?

पोलीस दल म्हणजे कायदा-सुव्यवस्था, गुन्हेगारी नियंत्रण आणि प्रशासकीय जबाबदाऱ्यांचे क्षेत्र. या क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून प्रामुख्याने अपेक्षा असते ती कठोर निर्णयक्षमता, शिस्त आणि तत्परतेची. मात्र आधुनिक प्रशासन केवळ अधिकार आणि आदेशांवर चालत नाही. नेतृत्व, संवाद, टीमवर्क, मनुष्यबळ व्यवस्थापन आणि निर्णयप्रक्रिया यांचा संस्थेच्या कामगिरीवर तितकाच प्रभाव असतो.

याच संदर्भात जालना जिल्ह्याचे अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून मिळविलेली पीएच.डी. विशेष लक्षवेधी ठरते.

त्यांनी ' ' या विषयावर संशोधन केले आहे. वरकरणी हा विषय लघुउद्योगांशी संबंधित वाटत असला, तरी त्यामागील मूलभूत प्रश्न कोणत्याही मोठ्या संस्थेला लागू होतोनेतृत्वाची पद्धत संस्थेच्या कामगिरीवर किती आणि कशी परिणाम करते? आणि हाच प्रश्न पोलीस प्रशासनालाही तितकाच लागू होतो. पीएच.डी. म्हणजे केवळ नावापुढील 'डॉ.' नव्हे शासकीय सेवेत असताना पीएच.डी. मिळविणे निश्चितच कौतुकास्पद आहे. मात्र या यशाकडे केवळ 'अधिकारी पीएच.डी. झाले' या अभिनंदनाच्या चौकटीत पाहणे अपुरे ठरेल. संशोधन म्हणजे एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास, उपलब्ध माहितीचे विश्लेषण, निष्कर्ष काढणे आणि त्या निष्कर्षांमधून व्यापक आकलन विकसित करणे.

पोलीस प्रशासनातही याची आज मोठी गरज आहे.

गुन्हे का वाढतात? एखाद्या परिसरात विशिष्ट प्रकारचे गुन्हे वारंवार का होतात? एखादे पोलीस ठाणे प्रभावीपणे काम करते आणि दुसरे अपेक्षित परिणाम का देत नाही? मनुष्यबळाची कमतरता किती परिणाम करते? अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमधील संवादाचा कामगिरीवर काय परिणाम होतो? तंत्रज्ञानाचा वापर किती प्रभावी आहे?

या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर केवळ अनुभवातून नव्हे, तर डेटा, संशोधन आणि विश्लेषणातून शोधण्याची गरज आहे.

नेतृत्व म्हणजे फक्त आदेश देणे नाही

पोलीस दलात वरिष्ठ अधिकाऱ्याच्या नेतृत्वाचा थेट परिणाम संपूर्ण यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर होतो.

एखादा अधिकारी केवळ आदेश देतो की आपल्या टीमला निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेतो? चुका झाल्यावर केवळ कारवाई करतो की त्यामागील कारणेही समजून घेतो? कर्मचाऱ्यांचा आत्मविश्वास वाढवतो की केवळ दबाव निर्माण करतो? कामगिरीचे मूल्यमापन केवळ आकडेवारीवर करतो की परिस्थितीचाही विचार करतो? हे प्रश्न नेतृत्वशैलीचे आहेत. डॉ. साळी यांच्या संशोधनाचा विषय अशाच व्यापक प्रश्नांकडे लक्ष वेधतो. त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक अभ्यासाचा संबंध केवळ विदर्भातील लघुउद्योगांपुरता मर्यादित न ठेवता प्रशासनातील नेतृत्वाच्या गुणवत्तेबाबतच्या व्यापक चर्चेशी जोडणे आवश्यक आहे. पोलीस प्रशासनाला 'रिझल्ट'सोबत 'रिसर्च'चीही गरज

आज पोलिसिंगचे स्वरूप बदलले आहे. पारंपरिक गुन्ह्यांसोबत सायबर गुन्हे, संघटित गुन्हेगारी, अमली पदार्थ, बेकायदा शस्त्रसाठा, आर्थिक गुन्हे आणि सोशल मीडियाशी संबंधित आव्हाने वाढत आहेत. अशा परिस्थितीत केवळ अधिक पोलिसांची संख्या वाढविणे पुरेसे नाही. उपलब्ध मनुष्यबळाचा योग्य वापर आणि प्रभावी नेतृत्व आवश्यक आहे. उदाहरणार्थ, एखाद्या पोलीस ठाण्यात गुन्हे उकलण्याचे प्रमाण कमी असेल तर त्यामागे फक्त कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता कमी आहे, असा सरळ निष्कर्ष काढणे योग्य नाही. तपासाचे प्रशिक्षण, वरिष्ठांचे मार्गदर्शन, तांत्रिक साधनांची उपलब्धता, कामाचा ताण, संवादाची पद्धत आणि टीममधील समन्वय या सर्व घटकांचा अभ्यास करावा लागतो. यासाठी संशोधनात्मक दृष्टिकोन आवश्यक आहे. 'आदेश' आणि 'नेतृत्व' यातील फरक समजण्याची वेळ प्रशासकीय व्यवस्थेत वरिष्ठ पदावर असणे म्हणजे आपोआप चांगले नेतृत्व करणे नव्हे. अधिकारामुळे आदेशाचे पालन होऊ शकते; पण विश्वासामुळे टीम उत्कृष्ट काम करू शकते. पोलीस दलासारख्या शिस्तबद्ध व्यवस्थेत आदेश आणि शिस्त अपरिहार्य आहेत. मात्र त्यासोबत संवाद, प्रेरणा आणि संघभावना यांची जोड असेल तर कार्यक्षमता वाढू शकते. यामुळे नेतृत्वशैलीचा अभ्यास करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याची पीएच.डी. ही प्रशासनाच्या दृष्टीनेही विचार करण्यासारखी बाब आहे. या संशोधनाचा उपयोग पोलीस दलासाठी कसा होऊ शकतो? डॉ. साळी यांच्या संशोधनातील निष्कर्ष पोलीस प्रशासनाच्या संदर्भात थेट लागू होतीलच असे गृहीत धरता येणार नाही. कारण लघुउद्योग आणि पोलीस दल यांच्या कार्यपद्धती वेगळ्या आहेत. मात्र नेतृत्व आणि संघटनात्मक कामगिरी यांच्यातील संबंधाचा अभ्यास पोलिसिंगसाठी उपयुक्त विचारप्रवाह देऊ शकतो. पोलीस दलात कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रशिक्षण, संवाद, टीमवर्क, नेतृत्व विकास, तणाव व्यवस्थापन आणि निर्णयक्षमतेवर अधिक संशोधन झाले तर त्याचा दीर्घकालीन फायदा होऊ शकतो. यापुढे पोलीस विभागानेही अशा अधिकाऱ्यांच्या शैक्षणिक आणि संशोधन क्षमतेचा संस्थात्मक उपयोग करून घेण्याचा विचार करायला हवा. मात्र एक प्रश्नही तितकाच महत्त्वाचा डॉ. साळी यांचे शैक्षणिक यश निश्चितच अभिनंदनीय आहे. परंतु कोणत्याही अधिकाऱ्याच्या बाबतीत पीएच.डी. ही प्रशासकीय कामगिरीची हमी नाहीआणि प्रशासकीय पदावरील कामगिरी ही शैक्षणिक पात्रतेनेच मोजता येत नाही. खरा कस लागतो तो ज्ञानाचा व्यवहारात वापर करण्याचा. संशोधनातून नेतृत्वाचे जे धडे मिळाले आहेत, ते पोलीस दलातील मनुष्यबळ व्यवस्थापन, टीमवर्क आणि निर्णयप्रक्रियेत कितपत उपयोगी पडतात, हे भविष्यात अधिक महत्त्वाचे ठरेल. याच ठिकाणी डॉ. साळी यांच्यासमोर एक संधी आहेसंशोधक म्हणून मिळविलेले ज्ञान आणि पोलीस अधिकारी म्हणून मिळविलेला प्रत्यक्ष अनुभव यांची सांगड घालण्याची.

जालन्यासाठीही ही सकारात्मक बाब जालना जिल्ह्यासारख्या वेगाने बदलणाऱ्या जिल्ह्यात कायदा-सुव्यवस्थेची आव्हाने कमी नाहीत. वाढती शहरीकरणाची प्रक्रिया, गुन्हेगारीचे बदलते स्वरूप, अवैध शस्त्रसाठा, अमली पदार्थ, वाहतूक आणि सायबर गुन्हे अशा विविध बाबींवर पोलीस यंत्रणेला सातत्याने काम करावे लागते. अशा वेळी 'फील्ड अनुभव + संशोधनात्मक दृष्टिकोन' असलेले अधिकारी ही प्रशासनासाठी निश्चितच जमेची बाजू ठरू शकतात.

# पान १ व ४ वरुन...

### जालन्यात...

अनुषंगाने शहरातील अनधिकृत जाहिरात साहित्यावर कारवाई केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

त्यामुळे आता जालना शहरात या आदेशांची अंमलबजावणी प्रत्यक्षात किती होते, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. २४ तासांची मुदत सामान्य नागरिकांसाठी आहे की सर्वांसाठी? फौजदारी कारवाईचा इशारा सर्व प्रकारच्या अनधिकृत फलकांना लागू आहे की राजकीय फलकांना काही वेगळी सवलत आहे? विद्युत खांबांवर फलक लावणाऱ्यांवर प्रत्यक्ष गुन्हे दाखल होणार आहेत का? या प्रश्नांची उत्तरे आगामी काही दिवसांत मिळण्याची शक्यता आहे.

**'दौऱ्याच्या आधी'ची कारवाई की 'दौऱ्यानंतर'?**

मुख्यमंत्र्यांचा दौरा १४ ऑगस्ट रोजी असल्याने सध्या शहरात बॅनरबाजीचा वेग वाढला आहे. त्यामुळे मनपा प्रशासनाने दौऱ्यापूर्वीच शहराची पाहणी करून अनधिकृत फलक हटविले, तर आपल्या आदेशांची अंमलबजावणी प्रत्यक्षात होत असल्याचा संदेश जाईल.

परंतु अनधिकृत फलकांकडे दुर्लक्ष करून दौरा संपल्यानंतर कारवाई केली गेली, तर प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. विशेषतः ज्या फलकांवर मुख्यमंत्री, मंत्री, आमदार, खासदार किंवा इतर राजकीय नेत्यांचे फोटो आहेत, त्यांच्यावर कारवाई करताना प्रशासन किती निष्पक्ष भूमिका घेते, याकडे जालनेकरांचे लक्ष राहणार आहे. महापालिकेने आपल्या सूचनेत जाहिरात संस्था आणि प्रिंटिंग प्रेसनाही नियमांचे पालन करण्यास सांगितले आहे. त्यामुळे अनधिकृत फलक तयार करून देणाऱ्या किंवा लावण्यासाठी मदत करणाऱ्या घटकांची जबाबदारीही निश्चित होऊ शकते. मुख्यमंत्री दौऱ्याच्या निमित्ताने तयार करण्यात आलेल्या फलकांबाबतही संबंधित जाहिरातदारांनी महापालिकेची परवानगी घेतली आहे का, याची पडताळणी करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे.

जालना शहरात यापूर्वीही विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात बॅनरबाजी होत आली आहे. मात्र यावेळी प्रशासनाने स्वतःहून २४ तासांची मुदत, जप्ती, दंड आणि फौजदारी कारवाई अशा कठोर शब्दांत इशारा दिल्याने नागरिकांमध्येही उत्सुकता निर्माण झाली आहे. आता १४ ऑगस्टच्या मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यापूर्वी मनपा पथक रस्त्यावर उतरते का? विद्युत खांबांवरील अनधिकृत फलक हटवते का? कोणकोणत्या फलकांना परवानगी आहे, याची माहिती जाहीर करते का? आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध प्रत्यक्ष गुन्हे दाखल करते का? याकडे जालनेकरांचे लक्ष लागले आहे. महापालिका आयुक्त अंजली शर्मा यांनी घेतलेली कठोर भूमिका शहरातील अनधिकृत बॅनरबाजीला आळा घालण्यासाठी महत्त्वाची ठरू शकते. मात्र प्रशासनाच्या आदेशांची खरी विश्वासार्हता ते कोणावर आणि किती समानपणे लागू केले जातात, यावर अवलंबून राहणार आहे.

मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याच्या निमित्ताने शहरात झळकणाऱ्या प्रत्येक फलकाची परवानगी तपासून अनधिकृत फलकांवर कारवाई केली गेली, तर महापालिकेच्या नियमांना 'राजकीय वजन' नसल्याचा स्पष्ट संदेश जाईल. उलट, केवळ सर्वसामान्य किंवा व्यावसायिकांच्या फलकांवर कारवाई करून राजकीय स्वागत फलकांकडे दुर्लक्ष झाले, तर 'नियम सर्वांसाठी समान आहेत की सत्तेनुसार बदलतात?' हा प्रश्न अधिक तीव्र होणार आहे.

त्यामुळे आता जालना शहरात केवळ बॅनर्सची गर्दी किती आहे, यापेक्षा मनपा प्रशासन त्या बॅनर्सपैकी किती अधिकृत आणि किती अनधिकृत आहेत हे स्पष्ट करते आणि अनधिकृतांवर नेमकी काय कारवाई करते, याकडेच सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सुजित जोगस...

प्रशासनाच्या निदर्शनास आल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

निवडून आलेल्या अधिकृत नगरसेवक व नगरसेविकांनाच महापालिकेच्या कामकाजात सहभागी होण्याचा आणि प्रशासकीय निर्णय प्रक्रियेत आपले मत मांडण्याचा अधिकार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.परिपत्रकातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे काही व्यक्ती स्वतःला नगरसेवक असल्याचा भास निर्माण करत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आल्याचा उल्लेख. सामाजिक माध्यमांवर किंवा सार्वजनिक व्यासपीठांवर स्वतःचा नगरसेवक म्हणून उल्लेख करणे, अधिकारी-कर्मचाऱ्यांना दूरध्वनीवरून नगरसेवक असल्याचे सांगणे, महापालिका कार्यालयात नगरसेवकांच्या अधिकारात भेटी देण्याचा प्रयत्न करणे अथवा खासगी कार्यालयांमध्येही नगरसेवक म्हणून ओळख सांगणे, अशा प्रकारांना प्रशासनाने गंभीर स्वरूपाचे मानले आहे.

याच पार्श्वभूमीवर संबंधितांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते, असा इशाराही देण्यात आला आहे. याच परिपत्रकानंतर शहरात राहुल लोणीकर यांच्या जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अध्यक्षपदी निवडीबद्दल अभिनंदनाचे फलक लागले आहेत. त्यातील एका फलकावर प्रा. सुजित जोगस यांच्या नावासमोर 'सभापती विद्युत व शिक्षण मनपा जालना शहर' असा उल्लेख असल्याचे सांगण्यात येत आहे.

यामुळे या बॅनरने प्रशासनाच्या परिपत्रकातील एका महत्त्वाच्या मुद्द्याकडे पुन्हा लक्ष वेधले आहे. जर संबंधित व्यक्ती महापालिकेचे निवडून आलेले नगरसेवक किंवा अधिकृत सभापती नसतील, तर त्यांच्या नावासमोर महापालिकेच्या पदाचा उल्लेख कशाच्या आधारे करण्यात आला? हा उल्लेख बॅनर तयार करणाऱ्याने केला की संबंधितांच्या माहितीनुसार करण्यात आला? या पदनामासाठी महापालिकेची कोणतीही अधिकृत मान्यता किंवा ठराव आहे का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

**'सभापती' पदाचा उल्लेख अधिकृत आहे का?**

महापालिकेतील समितीचे सभापतीपद हे केवळ बॅनरवरील पदनाम नसून ते अधिकृत प्रशासकीय रचनेशी संबंधित असते. त्यामुळे एखाद्या व्यक्तीने स्वतःच्या नावासमोर महापालिकेतील पदाचा उल्लेख केला असल्यास त्याची सत्यता तपासणे महत्त्वाचे ठरते. यामुळे महापालिका प्रशासनाने या बॅनरची दखल घेऊन 'सभापती विद्युत व शिक्षण मनपा जालना शहर' हा उल्लेख कोणत्या अधिकृत पदावर आधारित आहे, याचे स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी होऊ शकते.

तसेच हा उल्लेख चुकीचा असल्यास संबंधित बॅनर लावणाऱ्यावर अथवा त्यातील चुकीच्या पदनामासाठी जबाबदार व्यक्तींवर आयुक्तांच्या परिपत्रकातील निर्देशांनुसार कारवाई केली जाणार का, हेही स्पष्ट होणे गरजेचे आहे.

परिपत्रक केवळ कार्यालयापुरतेच मर्यादित राहणार?

आयुक्तांच्या परिपत्रकात मुख्यालय, प्रभाग कार्यालये आणि विकासकामांच्या ठिकाणी नातेवाईकांचा हस्तक्षेप रोखण्याच्या सूचना आहेत. मात्र त्याचबरोबर स्वतःला नगरसेवक म्हणून सादर करण्याच्या प्रकाराचाही उल्लेख करण्यात आला आहे.

त्यामुळे या परिपत्रकाचा अर्थ केवळ कार्यालयात प्रवेश करण्यापुरता मर्यादित आहे की सार्वजनिक व्यासपीठांवर किंवा बॅनरवर महापालिकेचे पदनाम वापरण्यालाही त्याचा संदर्भ लागू होतो, याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडणे आवश्यक आहे. विशेषतः महापालिकेच्या नावाचा आणि पदाचा वापर होत असल्याने या बाबीकडे केवळ राजकीय अभिनंदन फलक म्हणून दुर्लक्ष करता येईल का, हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो.

**प्रशासनाच्या आदेशाची पहिलीच परीक्षा?**

आयुक्त अंजली शर्मा यांनी परिपत्रकाद्वारे अधिकारी-कर्मचाऱ्यांना स्पष्टपणे सांगितले आहे की, नगरसेवकांच्या नातेवाईकांनी दिलेल्या मौखिक अथवा लेखी सूचनांचे पालन करू नये. कायद्याने किंवा नियमाने अनुज्ञेय नसलेली कामे त्यांच्या दबावाखाली करू नयेत. मात्र आता शहरातील एका बॅनरवरील महापालिकेच्या पदनामामुळे या परिपत्रकाची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी होते, याकडे लक्ष लागले आहे. जर प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेऊन बॅनरवरील पदनामाची पडताळणी केली आणि ते चुकीचे आढळल्यास नियमानुसार कारवाई केली, तर आयुक्तांच्या परिपत्रकाची अंमलबजावणी सर्वांसाठी समान असल्याचा संदेश जाईल.

**उलट, प्रशासनाने बॅनरकडे दुर्लक्ष केले तर 'परिपत्रक कागदावरच राहणार का?' असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो.**

महापालिका प्रशासनाने अनधिकृत फलकांविरोधातही नुकतीच कठोर भूमिका घेतली आहे. परवानगीशिवाय फलक लावल्यास जप्ती, दंड आणि फौजदारी कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. त्याच पार्श्वभूमीवर महापालिकेचे अधिकृत पदनाम नसताना ते नावासमोर वापरले जात असेल, तर त्याकडेही प्रशासनाने गांभीर्याने पाहणे अपेक्षित आहे.

कारण प्रश्न केवळ एका बॅनरचा नसून महापालिकेच्या अधिकृत पदांचा वापर कोण करू शकतो आणि कोण करू शकत नाही, या प्रशासकीय शिस्तीचा आहे.

मनपा आयुक्तांनी स्पष्टता देण्याची गरज

या संपूर्ण प्रकरणात संबंधित बॅनर नेमका कोणी लावला, त्यावरील मजकूर कोणी तयार केला, प्रा. सुजित जोगस यांना महापालिकेच्या कोणत्या अधिकृत पदाचा अधिकार आहे किंवा नाही, तसेच 'सभापती विद्युत व शिक्षण' हा उल्लेख कोणत्या आधारावर करण्यात आला, याची वस्तुनिष्ठ पडताळणी होणे आवश्यक आहे.

त्यामुळे महापालिका आयुक्त अंजली शर्मा यांनी या प्रकरणाची दखल घेत बॅनरवरील पदनामाची सत्यता तपासून, चुकीचा उल्लेख असल्यास कोणती कारवाई केली जाणार, याबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.नगरसेवकांच्या नातेवाईकांचा महापालिका प्रशासनातील अनधिकृत हस्तक्षेप रोखण्यासाठी जारी केलेले परिपत्रक हे प्रशासनातील अधिकारांची स्पष्ट विभागणी आणि पारदर्शकतेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. मात्र कोणत्याही आदेशाची खरी ताकद त्याच्या निष्पक्ष अंमलबजावणीत असते.

त्यामुळे प्रा. सुजित जोगस यांच्या नावासमोर वापरण्यात आलेल्या 'सभापती विद्युत व शिक्षण मनपा जालना शहर' या पदनामाची मनपा प्रशासन चौकशी करणार का? पदनाम अधिकृत नसल्यास बॅनरवर कारवाई होणार का? आणि आयुक्तांच्या परिपत्रकातील तरतुदी या प्रकरणाला लागू होतात का? याची उत्तरे आता महापालिका प्रशासनाला द्यावी लागणार आहेत.

या प्रकरणात प्रशासनाची पुढील भूमिका केवळ एका बॅनरपुरती मर्यादित न राहता, महापालिकेच्या अधिकृत पदनामांचा वापर आणि लोकप्रतिनिधींच्या नातेवाईकांची सार्वजनिक ओळख याबाबत भविष्यातील नियमांची दिशा ठरविणारी ठरू शकते.

## संत सावता माळी...

संत सावता माळींचा उल्लेख केला जातो. संत सावता माळींच्या विचारांचा केंद्रबिंदू हा सामान्य माणूस होता. प्रामाणिकपणे केलेला श्रम हीच ईश्वरसेवा आहे, काम करताना देवाचे नामस्मरण करता येते आणि भक्तीसाठी संसाराचा त्याग करण्याची आवश्यकता नाही, असा संदेश त्यांनी आपल्या अभंगांमधून दिला. त्यांच्या अभंगांमध्ये जात-पात, भेदभाव आणि अहंकारापेक्षा माणुसकी, समता आणि भक्तीला महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्या रचना आजही वारकरी संप्रदायासह समाजातील सर्व स्तरांतील नागरिकांना प्रेरणा देतात.''भक्तीबरोबर समाजजागृतीही महत्त्वाची''

संत सावता माळींच्या अभंगांमध्ये लोकजागृतीची मोठी ताकद होती. सामान्य माणसाला समजेल अशा सोप्या भाषेत त्यांनी अध्यात्म आणि जीवनमूल्ये मांडली. त्यामुळे त्यांचे साहित्य केवळ धार्मिक अभंगांपुरते मर्यादित न राहता सामाजिक प्रबोधनाचे माध्यम ठरले.

आजच्या काळातही संत सावता माळींचे विचार समाजासाठी मार्गदर्शक आहेत. तरुण पिढीने संतांच्या विचारांचा अभ्यास करून प्रामाणिक श्रम, सामाजिक समता, बंधुभाव आणि माणुसकीची मूल्ये अंगीकारावीत, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमाला शिवसेना शहर संघटक दिनेश भगत, युवा सेनेचे पांडुरंग शिंदे, शेषराव तिरगुडे, विजय कदम, आकाश माने, बालाजी धोकळे, विशाल तिरुगुडे, विक्की राजपूत, राहुल काटकर, विनायक शिंदे, शंकर राजपूत, रोहित राजपूत, पार्थ भुतेकर, परसराम कदम, विशाल शिंदे यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

संत सावता माळी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त उपस्थितांनी त्यांच्या पवित्र चरणी कोटी कोटी वंदन करत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

## जालना शहरात तिरंगा..

देशप्रेम आणि नागरिकांमध्ये राष्ट्रध्वजाबद्दलचा सन्मान अधिक दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश

तिरंगा हा देशाच्या एकता, अखंडता आणि सार्वभौमत्वाचे प्रतीक आहे. विविध जाती, धर्म, भाषा आणि सामाजिक स्तरातील नागरिकांनी एका तिरंग्याखाली एकत्र येणे, हा या रॅलीचा प्रमुख संदेश ठरला. प्रशासन, महानगरपालिका, लोकप्रतिनिधी, विद्यार्थी आणि नागरिक यांच्या सामूहिक सहभागातून जालना शहरात राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडले.

हजारो नागरिकांच्या सहभागामुळे तिरंगा रॅलीला उत्स्फूर्त स्वरूप प्राप्त झाले. रॅलीच्या समारोपावेळी उपस्थितांनी राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्यासोबतच देशाच्या प्रगतीसाठी आपापल्या परीने योगदान देण्याचा संदेश दिला.

## पाणलोटातून शाश्वत...

संधी उपलब्ध झाल्याने ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नाला हातभार लागला आहे. गावातच रोजगार उपलब्ध होण्यास मदत झाल्याने रोजगारासाठी होणारे स्थलांतर कमी करण्याच्या दृष्टीनेही हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे.

**मृद संधारण आणि भूजल पुनर्भरणाला चालना**

फळबागांमुळे जमिनीवर कायमस्वरूपी हिरवे आच्छादन तयार होत असल्याने मातीची धूप कमी होण्यास मदत होते. परिणामी सुपीक मातीचे संरक्षण होऊन जमिनीची उत्पादकता टिकविण्यास हातभार लागतो.

पाणलोट विकासाच्या कामांसोबत फळबाग लागवडीची सांगड घातल्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होत आहे. त्यामुळे भूजल पुनर्भरणाला चालना मिळून विहिरी व बोअरवेलमधील पाण्याची उपलब्धता सुधारण्यास मदत होत आहे. पाण्याचा काटकसरीने आणि नियोजनबद्ध वापर केल्यास फळबागांमुळे शेतकऱ्यांना दीर्घकालीन लाभ मिळण्याची शक्यता आहे.

**२३ हजार ७९० झाडांमुळे पर्यावरणालाही फायदा**

फळबाग लागवडीचा फायदा केवळ शेतकऱ्यांच्या उत्पन्नापुरता मर्यादित राहिलेला नाही. २३ हजार ७९० फळझाडांमुळे परिसरातील हरितक्षेत्र वाढण्यास मदत झाली आहे. झाडांमुळे मातीचे संरक्षण, जैवविविधतेला चालना आणि कार्बन शोषणास हातभार लागत आहे. त्यामुळे जलसंधारणाबरोबरच पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीनेही हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.

**जलसंधारणासोबत फळबागेची यशस्वी सांगड**

अंबड प्रकल्प क्रमांक १ मधील हा उपक्रम केवळ फळझाडे लावण्यापुरता मर्यादित नसून जलसंधारण, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, शेतकरी उत्पन्नवाढ, रोजगार निर्मिती आणि पर्यावरण संवर्धन यांना एकत्रितपणे पुढे नेणारा उपक्रम ठरत आहे. पाणलोट क्षेत्रात उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करून फळबागांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दीर्घकालीन आणि शाश्वत उत्पन्नाचा मार्ग उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या माध्यमातून झाला आहे.

पाणी साठे, झाडे वाढली, उत्पादनवाढीची आशा निर्माण झाली आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीचा नवा मार्ग खुला झाला, अशी या उपक्रमाची वाटचाल आहे. २.० अंतर्गत अंबड प्रकल्पातील फळबाग लागवड ही जलसंधारण आणि शाश्वत शेतीची प्रभावी सांगड घालणारी यशस्वी वाटचाल ठरत आहे.

## घरातील ध्वनी...

वरील गाणी, कार्यक्रम ऐकत असल्यामुळे त्यांना तरुण वयात होऊ लागलेल्या त्रासाकडे लक्ष वेधले. चर्चासत्राचे प्रास्ताविक निसर्गसेवक संस्थेचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी केले. तर चर्चासत्राचे संचालन माधवी दाबक यांनी केले. या चर्चासत्रास विविध क्षेत्रातील मान्यवर, पर्यावरण चळवळीतील कार्यकर्ते, संस्थेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संघटन मजबूत...

दिली. तसेच ''तूच आहेस तुझ्या भविष्याचा शिल्पकार'' हा प्रेरणादायी मंत्र देत कार्यकर्त्यांनी आत्मविश्वासाने संघटनात्मक कामाला लागण्याचे आवाहन त्यांनी केले. बैठकीच्या प्रास्ताविकात शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी जालना जिल्ह्यात शिवसेनेची संघटनात्मक ताकद दिवसेंदिवस वाढत असल्याचे सांगितले. जिल्ह्यात पक्षाचे संघटन विस्तारत असून कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह आहे. मात्र, महायुतीच्या माध्यमातून आपण सत्तेत असताना विकासकामे व शासकीय योजनांच्या बाबतीत मित्रपक्षांतील काही लोकप्रतिनिधींकडून शिवसेना कार्यकर्त्यांना दुजाभावाची वागणूक मिळत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. शिवसेनेच्या वाढीसाठी कार्यकर्त्यांनी सातत्याने मेहनत घेतली आहे. त्यामुळे विकासकामे, शासकीय योजना आणि स्थानिक प्रश्नांच्या बाबतीत शिवसेना कार्यकर्त्यांना योग्य स्थान व सन्मान मिळणे आवश्यक आहे. वरिष्ठ नेतृत्वाने कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून त्यांना बळ द्यावे, अशी अपेक्षा घुगे यांनी व्यक्त केली. बैठकीत विविध पदाधिकाऱ्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील संघटनात्मक परिस्थितीचा आढावा मांडला. आगामी काळात बूथनिहाय संघटन मजबूत करणे, नव्या कार्यकर्त्यांना पक्षाच्या प्रवाहात आणणे, जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठविणे तसेच शासनाच्या योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविणे, यावर विशेष भर देण्यात आला.

यावेळी काकासाहेब महाराज खैरे, सुभाषराव बोडखे, युवासेना लोकसभा अध्यक्ष गणेश मोहिते, युवा सेना जिल्हाध्यक्ष अमोल ठाकूर, अजय कदम, शेख जावेद, कैलास दुधानी, भास्करराव मगरे, कालींदाताई ढगे, छायाताई जराड, ईश्वर पाटील जुंबड, महादू गीते, नंदूभाऊ दाभाडे, कैलास चव्हाण, राजेंद्र चौधरी, कैलास वैद्य, दीपक दिघे, मनोज शिंदे, रामेश्वर नागवे, निवृत्ती डाके, सिताराम गोरे, रतनकुमार नाईक, हरिभाऊ कापसे, सखाराम शिरसागर, सय्यद इमरान, संभाजी गोरे, महेश रायकर, शिवाजी इंगळे, रुद्र घोगे, अनिल हिवराळे, अमोल दाभाडे, ऋषिकेश थोरात, राऊत पटेल, रामेश्वर नारायण ब्राह्मणे, भगवान ढाकणे, भगवान सावंत, जना बापू कोलते, राजू पाटील वायाळ, बाबासाहेब चंद, देवा ढाकणे, शेख मुनीर, सतीश चव्हाण, महेश सातपुते, दीपक खरात, रामेश्वर दराडे, विलास तुपे, गणपत केकान, विजय कठाळे यांच्यासह शिवसेना, युवासेना व विविध आघाड्यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गुणवत्तेची भरारी!

## स्वराली कासारेची शिष्यवृत्ती परीक्षेत दमदार कामगिरी

### भोकरदन तालुक्यात प्रथम; जालना जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकावला

**राजूर - प्रतिनिधी**

जिद्द, मेहनत आणि गुणवत्तेच्या जोरावर कु. स्वराली अरुण कासारे हिने इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. स्वरालीने भोकरदन तालुक्यात प्रथम, तर जालना जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकावत आपल्या यशाची शानदार नोंद केली. तिने ८९.३३ टक्के गुण मिळविले.



जि. ई. एस. एज्युकेशनल ग्रुप, राजूर येथील विद्यार्थिनी असलेल्या स्वरालीने मिळविलेल्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. तिच्या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे प्रोत्साहन आणि स्वरालीची सातत्यपूर्ण मेहनत यांचा मोलाचा वाटा आहे.स्वरालीच्या या उज्ज्वल यशाबद्दल जी ई एस एज्युकेशनल ग्रुप राजूर चे सर्वेसर्वा ज्ञानेश्वर पाटील पुंगळे, शाळेच्या प्राचार्या आशाताई पुंगळे. मुख्याध्यापक शाळा व्यवस्थापन, शिक्षक, पालक आणि शिक्षणप्रेमींकडून तिचे अभिनंदन करण्यात आले.

# ठेवीदारांचा विश्वास कायम ठेवत शेतकरी केंद्री बँकिंगला सर्वोच्च प्राधान्य

## नवनिर्वाचित अध्यक्ष राहुल लोणीकर यांचे प्रतिपादन

**मंठा -प्रतिनिधी**

बँकेच्या कारभारात ठेवीदारांचा विश्वास ही सर्वात मोठी जबाबदारी असल्याचे स्पष्ट केले.

ठेवीदारांच्या पैशांची सुरक्षितता, बँकेवरील विश्वास आणि ग्राहकांना दर्जेदार सेवा देणे याला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर बँकेच्या प्रत्येक निर्णयाच्या केंद्रस्थानी शेतकरी राहील आणि शेतकरीकेंद्री बँकिंग व्यवस्था अधिक सक्षम केली जाईल. शेतकऱ्यांना वेळेवर आर्थिक सुविधा मिळाव्यात तसेच ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहारांना चालना मिळावी यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. सहकार क्षेत्रातील बँक ही ग्रामीण अर्थव्यवस्थेची आधारशिला असून तिचे कामकाज अधिक लोकाभिमुख करण्याचा संकल्प करत ठेवीदारांचा विश्वास आणि शेतकऱ्यांचे हित हीच बँकेच्या पुढील वाटचालीची दोन प्रमुख सूत्रे असतील, असे प्रतिपादन दि जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष राहुल लोणीकर यांनी केले. नगरपंचायत मंठा येथे आयोजित भव्य नागरी सत्कार समारंभ कार्यक्रम प्रसंगी श्री राहुल लोणीकर बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, बँकेचा कारभार पारदर्शक, शिस्तबद्ध



आणि उत्तरदायी ठेवण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. शेतकऱ्यांना पीककर्ज वेळेत उपलब्ध होणे ही बँकेची मूलभूत जबाबदारी असून त्यासाठी आवश्यक नियोजन केले जाईल. कर्ज प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करून पात्र शेतकऱ्यांना सुलभ पद्धतीने आर्थिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल.

थकीत कर्जदार शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत त्यांना योग्य मार्गदर्शन करून कर्ज परतफेडीसाठी सकारात्मक वातावरण निर्माण केले जाईल. बँकेची आर्थिक शिस्त कायम राखतानाच शेतकऱ्यांच्या वास्तविक अडचणींकडे संवेदनशीलतेने पाहिले जाईल. कर्जाचा योग्य वापर, वेळेवर परतफेड आणि शेतकऱ्यांची आर्थिक क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यावर भर राहणार आहे. पारदर्शकता आणि शेतकरीहित यांचा समतोल साधून बँकेला अधिक सक्षम करण्याचा निर्धार राहुल लोणीकर यांनी यावेळी व्यक्त केला. केंद्र व राज्य शासनाच्या शेतकरी आणि ग्रामीण विकासाशी संबंधित विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी बँकेच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील. शासकीय योजना, अनुदान, कर्ज सुविधा आणि कृषीविषयक आर्थिक योजनांची माहिती ग्रामीण भागातील नागरिकांना सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येईल.

बँकेच्या शाखांमध्ये ग्राहकांना अधिक जलद आणि समाधानकारक सेवा मिळाव्यात यासाठी आवश्यक सुधारणा करण्यावर भर राहील. ग्रामीण भागातील ग्राहकांना आधुनिक बँकिंगचा लाभ मिळावा यासाठी डिजिटल बँकिंग आणि तंत्रज्ञानाधारित सेवांचा विस्तार करण्याचा मानस असून शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना बँकेच्या सेवांसाठी अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी ग्राहकाभिमुख व्यवस्था उभारली जाईल. शाखा पातळीपासून जिल्हास्तरापर्यंत सेवा अधिक गतिमान करण्यासाठी अधिकारी, कर्मचारी आणि संचालक मंडळाच्या समन्वयातून काम केले जाईल. शासनाच्या योजना आणि आधुनिक बँकिंग सेवा गावागावातील नागरिकांपर्यंत पोहोचविणे हे पुढील काळातील महत्त्वाचे उद्दिष्ट असेल, असेही राहुल लोणीकर यांनी स्पष्ट केले. दि. जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आगामी काळात व्यापक नियोजन करण्यात येणार असून बँकेची आर्थिक स्थिती अधिक भक्कम करताना शेतकरी, सभासद, ठेवीदार, ग्राहक आणि सहकारी संस्थांच्या हिताचा समतोल साधला जाईल.

कृषीपूरक व्यवसाय, पशुपालन, दुग्धव्यवसाय, लघुउद्योग आणि ग्रामीण उद्योजकतेला आर्थिक पाठबळ देण्यासाठी बँकेच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील. बँकेच्या कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून सेवा अधिक पारदर्शक, गतिमान आणि विश्वासार्ह करण्यावर भर दिला जाईल. संचालक मंडळ, अधिकारी-कर्मचारी, सभासद आणि ग्राहक यांच्या सहकार्याने बँकेला जिल्ह्यातील सक्षम आणि आदर्श सहकारी बँक बनविण्याचे उद्दिष्ट राहील. ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देत शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक प्रगतीमध्ये बँकेची भूमिका अधिक प्रभावी करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

# बूट फेकणे अन् शिवीगाळ चिंताजनक! न्यायव्यवस्था वाचवण्यासाठी मराठवाडा पक्षकार संघटनेचे देशभरात 'नैतिकता जनजागृती' अभियान; जालन्यातून सुरुवात

**जालना -प्रतिनिधी**

न्यायव्यवस्थेतील वाढत्या गैरवर्तनाच्या घटनांवर रोख लावण्यासाठी आणि वकिली क्षेत्रातील शिस्त टिकवून ठेवण्यासाठी मराठवाडा पक्षकार संघटनेच्या वतीने ११ ऑगस्ट २०२६ रोजी मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या विधी महाविद्यालयात व्यावसायिक नैतिकता जनजागृती कार्यक्रम पार पडला. या राष्ट्रीय अभियानाची सुरुवात जालन्यातून करण्यात आली असून, महाविद्यालय प्रशासनाने या उपक्रमाचे कौतुक केले आहे. तसेच, बार कौन्सिल ऑफ इंडियाने () हे नैतिकता जनजागृती अभियान देशभरातील सर्व विधी महाविद्यालयांमध्ये राबवावे, यासाठी शिफारस करण्याचे आश्वासनही महाविद्यालयाने दिले आहे.

**नैतिकता न पाळल्यास स्वतःच अडचणीत येऊः ॲड. महेश धन्नावत**

कार्यक्रमाचे मुख्य वक्ते ॲड. महेश धन्नावत यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ''जर आपण व्यावसायिक नैतिकतेचे पालन केले नाही, तर आपण स्वतःच मोठ्या संकटात सापडू शकतो. रोजच्या कामात नैतिकता असेल तरच आपण कोणतीही चिंता न करता शांतपणे झोपू शकतो. त्यामुळे नवोदित व कनिष्ठ वकिलांनी नैतिकतेचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही कामाला थेट नकार द्यायला शिकले पाहिजे.'' ते पुढे म्हणाले की, ''जर वकील आणि पक्षकारांनी न्यायव्यवस्थेचा आदर केला नाही, तर लोकशाहीचा हा एकमेव सक्रिय आणि मजबूत स्तंभज्यावर जनतेचा विश्वास आहेसंकटात येईल.''

**न्यायालयाची गरिमा राखली जात नाहीयेः नरेंद्र मोदी**

मराठवाडा पक्षकार संघटनेचे सचिव नरेंद्र मोदी यांनी तीव्र चिंता व्यक्त करताना सांगितले की, ''आजकाल वकील आणि पक्षकारांकडून न्यायालयाचा आदर आणि शिस्त राखली जात नाही. मुख्य न्यायाधीशांच्या दिशेने बूट फेकणे, न्यायाधीशांवर कागदपत्रे फेकून अपशब्द वापरणे, यांसारख्या घटना अत्यंत खेदजनक असून यामुळे न्यायव्यवस्थेच्या प्रतिमेला तडा जात आहे.''

**व्यक्तीपेक्षा सर्वोच्च पीठाचा आदर कराः ॲड. उम्माहेश्वरी जाधव**

ॲड. उम्माहेश्वरी जाधव म्हणाल्या की, ''नालसार () हैदराबादच्या विद्यार्थ्यांनी सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या जुन्या वक्तव्यांचा दाखला देत त्यांना पदवीदान समारंभाचे मुख्य अतिथी म्हणून विरोध करणे दुर्दैवी आहे. आपण व्यक्तीपेक्षा त्या सर्वोच्च पीठाचा आणि पदाचा आदर केला पाहिजे.''

**न्यायव्यवस्थेत करिअरवर मार्गदर्शन होणारः ॲड. विनोद कुलकर्णी**

जालना बार असोसिएशनचे सचिव ॲड. विनोद कुलकर्णी यांनी सांगितले की, ''विद्यार्थ्यांनी न्यायव्यवस्थेत करिअर कसे घडवावे, यावर बार असोसिएशनतर्फे लवकरच एका विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल.''

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख टी. वाय. यांच्यासह प्राध्यापक प्रा. गोरे एस. जे., प्रा. पवार आर. पी., प्रा. हंगरगे एस. डी., प्रा. पटेकर एस. यू., प्रा. जोशी व्हि. एस., प्रा. शेख एच. एम. आणि प्रा. घायाळ एच. बी. तसेच विधीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भरती परीक्षा पद्धती सुधारणांसाठी राज्यात उच्चस्तरीय समिती - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई - प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विविध सेवाभरतींसाठी होणाऱ्या परीक्षा पद्धतीत सर्वसमावेशक, अधिक सुरक्षित आणि सर्वसंमतीने सुधारणांसाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. या समितीने राज्यात प्रत्येक विभागात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत सर्वंकष सुधारणांबाबत अहवाल सादर करायचा आहे.

वर्षा निवासस्थानी आयोजित या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील उपस्थित होते, त्यांनीही विविध उपयुक्त सूचना बैठकीत केल्या. ही उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेत राहणार असून राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा त्यात समावेश असेल. या समितीने प्रत्येक महसुली विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षण संस्थाचालक आणि संबंधित घटकांशी चर्चा करून त्यांची मते जाणून घ्यायची आहेत. त्याआधारावर राज्यासाठीचे समग्र धोरण ठरविण्यात येईल अशी माहिती यावेळी देण्यात आली.

अलिकडेच केंद्र सरकारने पेपरफूट आणि परीक्षा गैरव्यवहारासंदर्भात संसदेत कायदा केला आहे. महाराष्ट्राचाही स्वतंत्र कायदा आहेच.

तथापि संसदेने केलेला कायदा अधिक कठोर असल्याने तो महाराष्ट्रातही लागू करण्यासंदर्भात येणाऱ्या पंधरवड्यात प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

# इस्लामिक नाटोचे बदलते समीकरण आणि भारताची भूमिका

पाकिस्तान, तुर्कस्तान आणि सौदी अरेबिया यांच्यातील वाढते सामरिक संबंध आणि संरक्षण सहकार्यामुळे पश्चिम आशियातील तसेच दक्षिण आशियातील भू-राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर या नव्या आघाडीला 'इस्लामिक नाटो' असे संबोधले जात असले, तरी त्याचे स्वरूप, उद्दिष्टे आणि भविष्यातील दिशा याबाबत सावधपणे विचार करणे आवश्यक आहे. पाकिस्तान आणि सौदी अरेबिया यांचे पारंपरिक संबंध आहेत. तुर्कस्तानशीही पाकिस्तानचे संरक्षण आणि सामरिक सहकार्य गेल्या काही वर्षांत वाढले आहे. सौदी अरेबियाला पश्चिम आशियात आपली सुरक्षा अधिक मजबूत करायची आहे, तर तुर्कस्तान प्रादेशिक राजकारणात आपली भूमिका विस्तारण्याचा प्रयत्न करीत आहे. पाकिस्तानलाही या सहकार्याच्या माध्यमातून आर्थिक तसेच सामरिक लाभ मिळवण्याची अपेक्षा असू शकते. त्यामुळे या तीन देशांचे वाढते सहकार्य केवळ धार्मिक समीकरणातून पाहणे योग्य ठरणार नाही; त्यामागे सुरक्षा, अर्थकारण, ऊर्जा आणि प्रादेशिक प्रभाव यांसारखे अनेक घटक आहेत.

मात्र भारतासाठी या घडामोडी निश्चितच महत्त्वाच्या आहेत. पाकिस्तान हा भारताचा शेजारी आणि दीर्घकाळापासून सुरक्षा आव्हान निर्माण करणारा देश आहे. दुसरीकडे तुर्कस्तानने अनेकदा पाकिस्तानच्या भूमिकेला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे पाकिस्तानला जर आर्थिक, तांत्रिक आणि लष्करी सहकार्याचा व्यापक आधार मिळाला, तर भारताने त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

विशेषतः संरक्षण क्षेत्रातील सहकार्य वाढल्यास त्याचा परिणाम दक्षिण आशियातील सामरिक संतुलनावर होऊ शकतो. मात्र अशा परिस्थितीत भारताने घाबरून प्रतिक्रिया देण्याऐवजी कूटनीती, आर्थिक ताकद, संरक्षण क्षमता आणि प्रादेशिक सहकार्य यांना अधिक बळ देणे आवश्यक आहे. भारताचे सौदी अरेबियाशीही घनिष्ठ आर्थिक आणि ऊर्जा संबंध आहेत. लाखो भारतीय नागरिक आखाती देशांमध्ये कार्यरत आहेत. त्यामुळे सौदी अरेबियाला भारतापासून दूर ढकलणारी भूमिका घेण्याऐवजी भारताने आपल्या आर्थिक आणि राजनैतिक संबंधांना अधिक व्यापक बनवले पाहिजे. तुर्कस्तानशीही संवादाचे मार्ग खुले ठेवणे भारताच्या दीर्घकालीन हिताचे ठरू शकते. आजच्या जगात कोणतीही आंतरराष्ट्रीय आघाडी कायमस्वरूपी एका दिशेनेच राहील असे नाही. देश आपल्या राष्ट्रीय हितानुसार मित्र आणि भागीदारी बदलत असतात. त्यामुळे 'इस्लामिक नाटो' अशी भीती निर्माण करण्यापेक्षा त्याच्या संभाव्य परिणामांचा शांतपणे आणि वास्तववादी पद्धतीने अभ्यास करणे गरजेचे आहे.

जगातील बदलती सामरिक समीकरणे भारतासाठी आव्हान असली, तरी ती संधीही आहेत. मजबूत अर्थव्यवस्था, सक्षम संरक्षण व्यवस्था आणि दूरदृष्टीचे परराष्ट्र धोरण यांच्या बळावर भारत कोणत्याही नव्या आघाडीचा सामना करण्यास सक्षम ठरू शकतो. त्यामुळे 'धोक्याची घंटा' वाजण्यापेक्षा भारताने आपल्या सामर्थ्याची घंटा अधिक बुलंद करणे हीच काळाची गरज आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# सुंदर साजिरा श्रावण आला

'' श्रावण महिना हा मराठी मनाला आणि निसर्गाला सुखावणारा एक अत्यंत देखणा आणि पवित्र उत्सव आहे. आषाढ महिन्यातील धुवांधार पावसानंतर जेव्हा निसर्ग संथ होतो, तेव्हा निसर्गाच्या आणि मानवाच्या मनाला भुरळ घालत श्रावण महिन्याचे आगमन होते. मराठी संस्कृतीत आणि निसर्गात श्रावणाला एका राजाचे स्थान दिले गेले आहे. बालकवींनी म्हटल्याप्रमाणे, ''श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे, क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊन पडे !'' या ओळी श्रावणाचे खरेखुरे रूप डोळ्यांसमोर उभे करतात. हा महिना म्हणजे निव्वळ पावसाचा काळ नसून तो ऊन-पावसाचा लपंडाव, सणांची रेलचेल, व्रतांची पवित्रता आणि निसर्गाचे अलौकिक सौंदर्य यांचा एक अप्रतिम संगम आहे.

श्रावण महिन्यातील निसर्गाचे रूप केवळ विलोभनीय असते. आषाढातील संततधारेने सुखावलेली धरणी आता हिरवागार शालू नेसून नटलेली असते. डोंगर, दऱ्या, मैदाने सर्व काही हिरवेगार होते. झाडांना नवी पालवी फुटते, आणि त्यावर पडणारे कोवळे ऊन निसर्गाचे सौंदर्य अधिकच खुलवते. श्रावणातल्या पावसाचे एक वेगळेच वैशिष्ट्य असते; तो मुसळधार नसून हलक्या सरींच्या स्वरूपात येतो. कधी अचानक काळे ढग जमा होतात आणि रिमझिम पाऊस सुरू होतो, तर कधी पुढच्याच क्षणी ढगाआडून सूर्य बाहेर पडतो आणि सोनेरी ऊन पडते. या ऊन-पावसाच्या खेळात आकाशात उमळणारे सप्तरंगी इंद्रधनुष्य मनाला सुखावून जाते. नद्या, नाले आणि धबधबे पूर्ण वेगाने वाहू लागतात, ज्यामुळे डोंगररांगांमधून पांढरे शुभ्र पाण्याचे प्रवाह खाली कोसळताना दिसतात. हे दृश्य पाहून मानवी मन प्रसन्नतेने भरून जाते.

निसर्गासोबतच श्रावण महिना हा धार्मिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचा मानला जातो. हा महिना सण आणि उत्सवांची मोठी मालिकाच घेऊन येतो. श्रावणाच्या सुरुवातीला जिवतीचा कागद देवघराजवळ चिकटवून दर शुक्रवारी जिवतीचे पूजन, आरती करायची जुनी परंपरा आपल्याकडे आहे.आपल्या अपत्यांच रक्षण व्हावं ही त्यामागील भावना आहे.

श्रावणाची सुरुवातच मुळी भक्तीभावाने होते. संपूर्ण महिनाभर घरोघरी आणि मंदिरांमध्ये धार्मिक वातावरणाची निर्मिती होते. या महिन्यात भगवान शिवशंकराची पूजा करण्याचे विशेष महत्त्व आहे. श्रावणी सोमवार हा या महिन्यातील अत्यंत पवित्र दिवस मानला जातो. या दिवशी सर्व शिवमंदिरांमध्ये हर हर महादेव आणि बं बम भोलेचा गजर ऐकायला मिळतो. भाविक महादेवाच्या पिंडीवर बेल-फूल वाहतात आणि उपवास करतात. मंदिरांमधून येणारा उदबत्त्यांचा सुगंध आणि घंटानाद संपूर्ण वातावरणात एक अद्भुत सकारात्मक ऊर्जा निर्माण करतो.

फक्त सोमवारच नाही, तर श्रावणातील प्रत्येक वाराला एक वेगळे धार्मिक महत्त्व आहे. मंगळवारी नवविवाहित स्त्रिया आपल्या सौभाग्यासाठी मंगळागौरीची पूजा करतात. संध्याकाळी पारंपरिक खेळ जसे की फुगडी, जिम्मा खेळले जातात, ज्यामुळे घरातील वातावरण आनंदी होते. शुक्रवारी जिवतीची पूजा आणि वरलक्ष्मी व्रत केले जाते, जे मुलांच्या आणि कुटुंबाच्या आरोग्यासाठी केले जाते. शनिवारी अश्वत्थ मारुतीची पूजा केली जाते. अशा प्रकारे संपूर्ण महिना उपवास, पूजा अर्चा आणि सात्त्विक आहार यामध्ये व्यतीत होतो. या व्रतांमुळे लोकांमध्ये शिस्त आणि संयम निर्माण होतो.

धार्मिक व्रतांव्यतिरिक्त श्रावणात येणारे सण सामाजिक एकोपा आणि कौटुंबिक जवळीक वाढवणारे असतात. श्रावणातील पहिला मोठा सण म्हणजे नागपंचमी. या दिवशी नागाची पूजा केली जाते आणि शेतकरी आपल्या शेतातील नागदेवतेचे आभार मानतात. निसर्गातील प्रत्येक जीवाला आदर देण्याची ही आपली संस्कृती नागपंचमीच्या माध्यमातून दिसून येते. या दिवशी मुली आणि महिला हातावर मेहंदी काढतात, नवीन कपडे घालतात आणि झाडाला पाळणे बांधून गाणी गातात.

त्यानंतर येतो तो भावा-बहिणीच्या पवित्र प्रेमाचा सण म्हणजेच नारळी पौर्णिमा आणि रक्षाबंधन. कोळी बांधव या दिवशी समुद्राला सोन्याचा नारळ अर्पण करून आपल्या व्यवसायाची पुन्हा सुरुवात करतात. तर बहिणी आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची आणि यशाची प्रार्थना करतात, आणि भाऊ तिच्या रक्षणाचे वचन देतो. श्रावणाच्या शेवटी येणारी गोकुळाष्टमी किंवा कृष्णजन्माष्टमी संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. दुसऱ्या दिवशी होणारा दहीहंडीचा उत्सव तर तरुणाईचा आवडता सण असतो. ''गोविंदा रे गोपाळा''च्या गजरात मानवी मनोरे रचून हंडी फोडण्याचा हा थरार श्रावणाची सांगता अत्यंत उत्साहात करतो. श्रावण महिन्याचे मानवी जीवनावर आणि विशेषतः शेतकऱ्यांवर मोठे ऋण आहे. शेतकरी वर्गासाठी हा महिना अत्यंत समाधानाचा असतो.

मृग नक्षत्रात पेरलेली पिके आता शेतात डोलू लागतात. शेतात येणारी हिरवळ पाहून शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर आनंदाचे हसू उमटते. हा महिना कष्टकऱ्यांना विश्रांती आणि येणाऱ्या सुगीच्या दिवसांची आशा देणारा ठरतो. शहरी जीवनातही श्रावण एक आल्हाददायक बदल घेऊन येतो. आठवड्याच्या शेवटी वीकेंडला लोक शहरातून बाहेर पडून लोणावळा, महाबळेश्वर, माळशेज घाट,माथेरान यांसारख्या पर्यटन स्थळांवर निसर्गाचा आनंद घेण्यासाठी गर्दी करतात. निसर्गाच्या सानिध्यात जाऊन ट्रेकिंग करणे किंवा धबधब्याखाली भिजणे हा एक वेगळाच आनंद असतो.



**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव.**
**८९९९५६६९१७**

# कृषी विद्यापीठांचे सेवा प्रवेश नियम अधिक सुसंगत करावे –कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई - प्रतिनिधी**

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा प्रवेश नियमांमध्ये एकसूत्रता आणून गुणवत्ता व ज्येष्ठतेला प्राधान्य मिळावे. सेवा प्रवेश नियम ह अधिक सुसंगत, गुणवत्ताधारित आणि राष्ट्रीय मानकांशी अनुरूप असावेत, असे निर्देश कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

आमदार रणधीर सावरकर यांच्यासह महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे तसेच चारही कृषी विद्यापीठांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत सेवा प्रवेश नियमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. शासनाने कृषी व पदुम विभागाच्या १० जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार चारही कृषी विद्यापीठांतील गट-अ व गट-ब संवर्गातील पदांच्या सुधारित आकृतिबंधास मान्यता दिली आहे. त्यानुसार राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला या चारही कृषी विद्यापीठांमध्ये सेवा प्रवेश नियमांची समान अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने या बैठकीत चर्चा करण्यात आली.

सेवा प्रवेश नियम निश्चित करताना 'गुणवत्ता व ज्येष्ठता' हे प्रमुख तत्व ठेवण्याची भूमिका बैठकीत मांडण्यात आली. शिक्षकवर्गीय तसेच शिक्षकेतर पदांसाठी सेवा प्रवेशाची प्रक्रिया निश्चित करताना संबंधित कायदे, परिनियम आणि शासन निर्णय यांचा आधार घेण्यात आला आहे. भारतीय कृषी अनुसंधान परिषद आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या मार्गदर्शक तत्वांचाही विचार करण्यात आला आहे. चारही कृषी विद्यापीठांमध्ये सेवा प्रवेश नियमांची एकसमान अंमलबजावणी व्हावी, यासाठी परिनियमांमधील संबंधित तरतुदींचा आधार घेऊन नियम तयार करण्याचा प्रस्ताव आहे. विद्यापीठांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर तसेच राष्ट्रीय स्तरावरील मानकांवर होणाऱ्या परिणामांचाही विचार करण्याचे निर्देश यावेळी कृषी मंत्री भरणे यांनी दिले.

# विकासाचे प्रश्न मार्गी लावून सामान्य जनतेला मूलभूत सुविधा देण्याचा प्रयत्न करावा - दानवे

**जालना -प्रतिनीधी**

शहरातील विकासाचे प्रश्न मार्गी लावतांनाचं सामान्य जनतेला मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर यांनी नवीन दालनाच्या माध्यमातून प्रयत्न करावा,अशी अपेक्षा माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री तथा भाजपाचे ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील दानवे यांनी येथे बोलतांना व्यक्त केली.

जालना मनपाचे स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर यांच्या महानगर पालिकेतील दालनाचा शुभारंभ माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे





यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार कैलाश गोरंट्याल,महानगर अध्यक्ष भास्कर दानवे, माजी नगराध्यक्षा तथा विद्यमान नगरसेविका संगीताताई गोरंट्याल,महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राउत, अक्षय गोरंटयाल, सभापती मायाताई जोशी, विजय पांगारकर, अनामिका पांगारकर, सौ. पानबिसरे, शशिकांत घुगे, बद्रीनाथ पठाडे, जीवन सले, रमेश गौरक्षक, अशोक पवार, महावीर ढक्का, शिवराज जाधव आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना माजी आमदार कैलास गोरंटयाल म्हणाले की, शहरातील जनतेने प्रथमच झालेल्या जालना मनपाच्या निवडणुकीत स्पष्ट बहुमत देत मनपाची सत्ता भाजपकडे सोपवली. जनतेचा विश्वास सार्थ ठरवत शहराचा चेहरा - मोहरा बदलण्यासाठी महापौर, उपमहापौर आणि सर्व सभापती, नगरसेवकांनी प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत अशी अपेक्षा त्यांनी शेवटी व्यक्त केली. यावेळी भास्कर दानवे यांनीही विकासाच्या मुद्द्यावर भर देऊन त्या दृष्टीने काम करण्याची अपेक्षा व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर यांनी आपल्या प्रास्ताविकातून जालना मनपाचे उत्पन्न वाढवण्यासाठी काय उपाययोजना करता येतील यासाठी प्रयत्न सुरू असून आगामी काळात मनपाचे उत्पन्न किमान १०० कोटीपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट असल्याचे स्पष्ट करून सर्वांना सोबत घेऊन जानेवारी २०२७ पर्यंत शहरातील जनतेला तिसऱ्या दिवशी पाणी पुरवठा करण्यासह स्वच्छ,सुंदर आणि हरित जालना करण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करणार असल्याची ग्वाही सभापती अशोक पांगारकर यांनी यावेळी दिली.या कार्यक्रमास अन्य नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

# पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा जालना जिल्हा दौरा कार्यक्रम

**जालना - प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहेत.

पालकमंत्री श्रीमती मुंडे यांचे शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ९.४५ वाजता शासकीय विश्रामगृह छत्रपती संभाजीनगर येथून जालनाकडे प्रयाण करतील. सकाळी १०.४५ वाजता आगमन व एमआयडीसी फेस वन छत्रपती संभाजीनगर चौफुली- जालना येथील भाजपा जिल्हा कार्यालय नवीन इमारत भूमीपूजन कार्यक्रमास उपस्थिती राहतील. त्यानंतर दुपारी १.०० वाजता जालना येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील. दुपारी २.०० वाजता आगमन व मुख्यमंत्री महोदयांच्या हर घर तिरंगा अभियान रॅलीत सहभागी होतील. सायंकाळी ५.०० वाजता छत्रपती संभाजीनगर येथून जालनाकडे प्रयाण करतील. सायंकाळी ६.०० वाजता शासकीय विश्रामगृह जालना येथे आगमन व राखीव.

शनिवार, दि. १५ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ९ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथील भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजीत शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमास उपस्थित राहतील. त्यानंतर सकाळी ९.३५ वाजता शासकीय वाहनाने परळी वैजनाथ जिल्हा बीडकडे प्रयाण करतील.

# जालन्याचा खेळाडू प्रथमच करणार भारताचे प्रतिनिधित्व

**जालना -प्रतिनीधी**

आगामी ऑक्टोंबर महिन्यात बेंगलुरू येथे होणार असलेल्या आशियाई मास्टर्स चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी जालन्यातील आयर्नमॅन कैलास झोळगे यांची निवड झाली असून त्यांच्या रूपाने जालन्याचा खेळाडू प्रथमच भारताचे प्रतिनिधित्व करणार असून या उल्लेखनीय व ऐतिहासिक यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

पुण्यातील बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडिया व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन यांच्या वतीने दि.८ व ९ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्य मास्टर्स एक्वाटिक चॅम्पियनशिप-२०२६ स्पर्धा आयोजित



करण्यात आली होती. या स्पर्धेत जालन्यातील आयर्नमॅन तथा प्रसिद्ध जलतरणपटू कैलास झोळगे या खेळाडूने दमदार कामगिरी करत तब्बल ५ पदकं पटकावत यशाचे शिखर गाठत जालना जिल्ह्याचे नाव उज्वल केले आहे. झोळगे यांनी ५०, १०० आणि २०० ब्रेस्टस्ट्रोक या तिन्ही प्रकारात सुवर्ण पदके पटकावली असून ५० फ्रीस्टाईल मध्ये रौप्य आणि ५० बटरफ्लाय मध्ये कांस्य पदकाची कमाई केली आहे. या उत्कृष्ट कामगिरीमुळे ऑक्टोबरमध्ये बेंगलुरु येथे होणाऱ्या आशियाई मास्टर्स चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांची निवड झाली आहे.

विशेष म्हणजे या स्पर्धेत महाराष्ट्रातील मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, कोल्हापूर, सातारा, सांगली, नाशिक, छत्रपती संभाजीनगर यांसह अनेक जिल्ह्यातील खेळाडूंनी भाग घेतला होता.

कैलाश झोळगे ह्यांच्या या अष्टपैलू कामगिरीमुळे संपूर्ण महाराष्ट्राला अभिमान वाटत आहे.

या यशाबद्दल आयपीएस अधिकारी बारकुंड डॉल्फिन स्पोर्ट्स क्लब व मित्रपरिवार यांच्यातर्फे पुढील स्पर्धेसाठी कैलाश झोळगे यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

**देशासाठी सुवर्णपदक जिंकण्याचे स्वप्न - झोळगे**

**राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंना ज्या सुविधांची गरज असते त्या उपलब्ध नसतांनाही जालन्यासारख्या एका मागास जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत कैलास झोळगे यांनी आपली यशाची परंपरा कायम राखली आहे. जालना - बालेवाडी आणि आता आशिया हा प्रवास स्वप्नवत असून सर्वांच्या पाठिंब्यामुळे हे शक्य झाले आहे. आता देशासाठी सुवर्णपदक जिंकण्याचे स्वप्न आहे अशी भावना झोळगे यांनी व्यक्त केली आहे.**

# विवेकानंद प्राथमिक शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

**परतूर - प्रतिनिधी**

: विवेकानंद प्राथमिक शाळेने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी शाळेतून बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी कुमारी नित्यश्री यादव आणि कुमारी सुरभी नरवडे या दोन्ही विद्यार्थिनी शिष्यवृत्तीधारक ठरल्या आहेत.





या उल्लेखनीय यशाबद्दल दोन्ही विद्यार्थिनींचा शाळेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेचे अध्यक्ष डॉ. एस. जी. बाहेकर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप दादा बाहेकर, मुख्याध्यापिका संगीता शिंदे मॅडम तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते. मान्यवरांनी दोन्ही विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थिनींच्या या यशामागे त्यांचे परिश्रम, पालकांचे प्रोत्साहन, मुख्याध्यापिका व शिक्षकांचे मार्गदर्शन यांचा मोठा वाटा आहे. विवेकानंद प्राथमिक शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची आणि विद्यार्थिकेंद्रित उपक्रमांची ही यशस्वी परंपरा असल्याचे यावेळी उपस्थितांनी गौरवोद्गार काढले.

# लॉयन्सतर्फे प्रांतीय स्तरावर स्वातंत्र्य दिनानिमित्त विशेष स्पर्धेचे आयोजन

## उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पाच क्लब्सचा होणार सन्मान-विजय दाड

**जालना - प्रतिनिधी**

लायन्स इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३४ एच २ च्यावतीने प्रांतीय स्तरावर यंदाचा स्वातंत्र्य दिन आणि देशभक्ती उत्सव अत्यंत उत्साहात व प्रभावीपणे साजरा केला जाणार आहे. या उपक्रमांतर्गत प्रांतातील उत्कृष्ट काम करणाऱ्या सर्वोत्कृष्ट ५ क्लब्सना सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती प्रांतपाल राहुल औसेकर आणि राष्ट्रीय उत्सव समन्वयक विजयकुमार दाड यांनी दिली.

डिस्ट्रिक्ट ३२३४ एच २ अंतर्गत येणाऱ्या सर्व क्लब्सच्या अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्षांना या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. क्लबसने आपल्या भागात प्रभात



फेरी, तिरंगा यात्रा, देशभक्तिपर गीत, नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रम, स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान व वीर शहीदांना श्रद्धांजली,भाषण, वाद-विवाद, निबंध व प्रश्नमंजुषा स्पर्धा,वृक्षारोपण व स्वच्छता अभियान,रक्तदान, आरोग्य तपासणी अथवा जनजागृती शिबिर, हर घर तिरंगा'' अभियानात सक्रिय सहभाग, अनाथाश्रम, वृद्धाश्रम अथवा हॉस्पिटलमध्ये सेवा कार्य, देशभक्ती विषयावर चित्रकला, पोस्टर अथवा रांगोळी स्पर्धा घ्यावी आणि प्रत्येक क्लबने आपल्या कार्यक्रमानुसार आयोजित केलेल्या उपक्रमाचा जास्तीत जास्त २ मिनिटांचा व्हिडिओ तयार करून ९३२५८२१८८९ या व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकावर पाठवायचा आहे. व्हिडिओ पाठवण्याची शेवटची तारीख १७ ऑगस्ट ही आहे. त्यानंतर व्हिडिओ स्वीकारले जाणार नाहीत. स्वातंत्र्य दिन व देशभक्ती उत्सवात अधिकाधिक क्लब्सनी सहभाग घेऊन हा उपक्रम यशस्वी करावा, असे आवाहन प्रांतपाल राहुल औसेकर, सचिव जितेंद्र महाजन, राष्ट्रीय उत्सव समन्वयक विजयकुमार दाड यांनी केले आहे.

# पाणलोटातून शाश्वत शेतीकडे; अंबडमध्ये ५१.६० हेक्टरवर २३,७९० फळझाडांची लागवड

## PMKSY २.० अंतर्गत ६५ शेतकरी कुटुंबांना आर्थिक स्थैर्याची नवी दिशा

**जालना - प्रतिनिधी**

: प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना ( २.०) अंतर्गत पाणलोट विकास घटक (-२.०) मध्ये अंबड प्रकल्प क्रमांक १ अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये राबविण्यात आलेल्या फळबाग लागवड उपक्रमाला चांगले यश मिळाले आहे. या उपक्रमातून ६५ शेतकऱ्यांच्या ५१.६० हेक्टर क्षेत्रावर तब्बल २३ हजार ७९० फळझाडांची लागवड करण्यात आली. या उपक्रमामुळे पारंपरिक शेतीला शाश्वत, अधिक उत्पन्न देणाऱ्या आणि पर्यावरणपूरक शेतीची जोड मिळाली आहे.



रोहिलागड, बदापूर, आवा, अंतरवाला, खेडगाव, चिकनगाव, कौचलवाडी तसेच इतर पाणलोट समिती क्षेत्रातील गावांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. जलसंधारणाच्या कामांसोबत फळबाग लागवडीची सांगड घातल्याने शेतकऱ्यांना पाण्याचा कार्यक्षम वापर, जमिनीचे संवर्धन, उत्पादनवाढ आणि रोजगारनिर्मितीचा लाभ मिळत आहे.

**५ प्रकारच्या फळझाडांची लागवड**

या उपक्रमांतर्गत विविध उच्चमूल्य फळपिकांना प्राधान्य देण्यात आले. त्यामध्ये डाळिंबाची १२ हजार ७०९, मोसंबीची ५ हजार ९४२, आंब्याची ३ हजार ९२०, सीताफळाची ७२० आणि पेरूची ४९९ रोपे असे एकुण २३ हजार ७९० रोपांची लागवड करण्यात आली. या फळबागांसाठी योजनेअंतर्गत ४३.०६ लाख रुपयांची गुंतवणूक करण्यात आली. पारंपरिक पिकांवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना फळपिकांकडे वळण्यासाठी या उपक्रमामुळे प्रोत्साहन मिळत आहे.

**शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला नवी दिशा**

डाळिंब, मोसंबी, आंबा, पेरू आणि सीताफळ यांसारख्या उच्चमूल्य फळपिकांमुळे भविष्यात शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा आहे. फळबागांची लागवड ही एकदाच होणारी प्रक्रिया नसून तिच्या देखभालीसाठी वर्षभर विविध कामांची आवश्यकता असते. त्यामुळे छाटणी, सिंचन, तणनियंत्रण, खत व्यवस्थापन, औषध फवारणी, काढणी, वर्गीकरण आणि बाजारपेठेपर्यंत माल पोहोचविणे अशा विविध टप्प्यांवर स्थानिक रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. विशेषतः महिलांनाही फळबागांच्या देखभाल व काढणीसारख्या कामांमध्ये रोजगाराच्या (पान २ वर)

# संघटन मजबूत करण्यासाठी शिवसेना कार्यकर्त्यांना निश्चित बळ देणार : राज्यमंत्री आशिष जैस्वाल

## बदनापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची संवाद व आढावा बैठक उत्साहात

**बदनापूर - प्रतिनिधी**

बदनापूर तालुक्यासह संपूर्ण जालना जिल्ह्यात शिवसेनेची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी तळागाळातील कार्यकर्त्यांना निश्चित बळ दिले जाईल. गाव, वाडी-वस्तीपासून बूथ पातळीपर्यंत संघटना सक्षम करण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी जनतेच्या प्रश्नांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून सातत्याने जनसंपर्क वाढवावा, असे आवाहन राज्याचे राज्यमंत्री तथा जालना जिल्ह्याचे संपर्कमंत्री आशिष जैस्वाल यांनी केले. बदनापूर विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची संवाद




व आढावा बैठक गुरुवारी (ता. ६) बदनापूर येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालयात उत्साहात पार पडली. यावेळी राज्यमंत्री तथा जालना जिल्ह्याचे संपर्कमंत्री आशिष जैस्वाल, शिवसेना संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर, पंडितराव भुतेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, संपर्कप्रमुख ए. जे. बोराडे यांच्यासह शिवसेना, युवासेना व विविध आघाड्यांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना आशिष जैस्वाल म्हणाले की, प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्या कार्यक्षेत्रात पक्षाची भूमिका तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवावी. केवळ निवडणुकीपुरता जनसंपर्क मर्यादित न ठेवता वर्षभर जनतेच्या संपर्कात राहून त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत. तळागाळातील कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळेच पक्षाची संघटना मजबूत होत असते. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढवून संघटन विस्तारण्यावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. ''शिवसेना कार्यकर्त्यांच्या पाठीशी वरिष्ठ नेतृत्व ठामपणे उभे राहील. कार्यकर्त्यांना आवश्यक ते बळ देण्यासाठी आपण निश्चितपणे पुढाकार घेऊ,'' अशी ग्वाहीही जैस्वाल यांनी (पान २ वर)

# घरातील ध्वनी प्रदूषणाकडे लक्ष देण्याची गरज- देवेंद्र भुजबळ

**जालना - प्रतिनिधी**

आपल्या घरात मिक्सर, वॉशिंग मशिन, व्हॅक्युम क्लिनर आदी उपकरणांच्या कर्कश्श आवाजामुळे जे ध्वनी प्रदूषण होत असते, त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन निवृत्त माहिती संचालक श्री देवेंद्र भुजबळ यांनी केले. ते पुणे येथील निसर्गसेवक संस्थेने नुकत्याच आयोजित केलेल्या ''कर्णकर्कश आवाज - कायदा- आरोग्य आणि आपण'' या विषयावरच्या चर्चा सत्रात भाग घेताना बोलत होते. श्री देवेंद्र भुजबळ यांनी जेष्ठ श्रवणतज्ज्ञ डॉ. कल्याणी मांडके, पर्यावरण विषयातील कायदेतज्ज्ञ अमोघ परळीकर, आणि प्रा. महेश शिंदीकर यांनी



व्यक्त केलेली मते , अनुभव हे धार्मिक सण समारंभ, शुभ कार्ये या दरम्यान होणारे ध्वनि प्रदूषण, नवीन इमारतींच्या बांधकामामुळे होणारे प्रदूषण या पुरतेच मर्यादित असल्याचे निदर्शनास आणून देऊन

श्री देवेंद्र भुजबळ यांनी घराबाहेरील प्रदूषण हे प्रासंगिक असते तर घरातील उपकरणांमुळे होणारे ध्वनी प्रदूषण हे सातत्याने होत असल्यामुळे त्याचा घरातील व्यक्तींवर काय दुष्परिणाम होतो, तो कसा रोखता येईल, याचा अभ्यास करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

श्री भुजबळ यांच्या मताशी सहमती दर्शवित एका गृहिणीने मिक्सर वापरताना, त्याच्या आवाजाचा किती त्रास होतो ते सांगितले. तर दुसऱ्या एका व्यक्तीने एक प्रसिद्ध प्रवचनकार घरातील पंख्याच्या आवाजामुळे झोपू शकत नसल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार, झोपताना गाणी लावून ती ऐकत झोपतात,असे सांगितले. तर आणखी एका व्यक्तीने आजकालची मुले, मुली सारखा हेड फोन लावून मोबाईल (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.